ePaper

## जयंत पाटील भाजपाच्या वाटेवर: विजय वडेट्टीवार



| वर्ष - 7 । अंक - 98 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**


- ब्रायन लाराची हकालपट्टी
- जॅकलीनला 'ग्रीन सिग्नल'!
- राज्यसभेत दिल्ली विधेयक मंजूर
- पवारांनी पक्षावर दावा ठोकणे दुर्दैवी


www.mahaenews.com । मंगळवार , दिनांक 8 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# समाज विकास विभाग 'वंचित'!

## पुरेसे मनुष्यबळ नाही; प्रशासनाचे दुर्लक्ष : योजनांच्या अंमलबजावणीवर परिणाम?

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी- चिंचवडमध्ये महापालिका प्रशासनाकडून सुरू असलेली उपयोगकर्ता शुल्काची दंड वसुलीला अखेर स्थगिती मिळाली आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीमध्ये याबाबत सविस्तर बैठक घेण्यात येईल आणि तोपर्यंत ही वसुली थांबवावी, असा मोठा निर्णय कॅबिनेट मंत्री डॉ. उदय सामंत यांनी घेतला. त्यामुळे सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांना दिलासा मिळाला आहे.**



पिंपरी । विशेष प्रतिनिधी "देशातील शेवटच्या घटकाचा विकास..." हे ब्रिद घेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यातील महायुती सरकार काम करीत आहे. त्यासाठी 'शासन आपल्या दारी' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम घेण्यात येत आहे. त्याद्वारे आर्थिक दुर्बल घटकांसाठी असलेल्या विविध योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा नारा दिला जात आहे. मात्र, तब्बल ७० हून अधिक योजनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असलेला समाज विकास विभाग पुरेशा मनुष्यबळापासून 'वंचित' आहे. परिणामी, विभागाच्या कामकाजाचा ताण वाढला असून, प्रशासन विभागाची डोळेझाक चव्हाट्यावर आली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका समाज विकास विभागाच्या माध्यमातून शहरातील सुमारे ३० लाख लोकांमधून किमान दीड लाख लोकांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ दिला जातो. दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती, गरीब, अपंग व मागासवर्गीय व्यक्तींच्या विकासाकरिता कल्याणकारी योजना राबवल्या जातात. त्यासाठी या विभागात एकूण १५ विविध पदे आहेत. मात्र, त्यापैकी महत्त्वाची पदे अद्याप रिक्त असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. परिणामी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'शेवटच्या घटकाचा विकास' या हेतुला महापालिका प्रशासन हरताळ फासत आहे काय? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे. समाज विकास विभागांतर्गत मुख्य समाज विकास अधिकारी, सहायक समाज विकास अधिकारी आणि समाज विकास अधिकारी अशी महत्त्वाची तीन पदे आहेत. सदर तीनही पदे रिक्त आहे. सुहास बहाद्दुरपरे हे समाज विकास अधिकारी आहेत. मात्र, ते एप्रिल- २०२३ पासून आजारी असल्याच्या कारणास्तव दीर्घ मुदतीच्या रजेवर आहेत. कार्यालय अधिक्षक आणि पूर्णवेळ प्रशासन अधिकारी नसल्यामुळे योजनांची अंमलबजावणी करण्यात अनेक अडचणी येत आहेत. विभागप्रमुखांवर नियोजना ऐवजी अंमलबजावणीची जबाबदारी आली आहे. पर्यवेक्षक संवर्गातील अधिकाऱ्यांच्या अभावामुळे समाज विकास विभागाच्या एकूण कार्यक्षमतेवर परिणाम झालेला आहे.

### समाजसेवक पदही रिक्त...

शहरातील नागरिकांना विविध योजनांचा लाभ मिळावा. एकही लाभार्थी योजनेपासून वंचित राहू नये, अशी भूमिका वारंवार आयुक्त शेखर सिंह आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बोलून दाखवली आहे. मात्र, आकृतीबंधाप्रमाणे समाज विकास विभागातील ४ पैकी ३ समाजसेवक पदे अनेक महिन्यांपासून रिक्त आहेत. योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नियुक्त केलेले १७ समूह संघटक अद्याप भरलेली नाही. सदर पदे हंगामी आणि मानधन तत्त्वावर आहेत. तरीही प्रशासन त्याकडे कानाडोळा करीत आहे. परिणामी, योजनांची अंमलबजावणी आणि फॉलोअप होत नाही. त्यामुळे अनेक लाभार्थी योजनांपासून वंचित राहण्याची भिती व्यक्त केली जात आहे.



"समाज विकास विभागातील रिक्त पदांची नियुक्ती करण्याबाबत प्रशासन विभागाकडे पाठपुरावा केला आहे. लवकरच ही पदे भरली जातील. मनुष्यबळ कमी असले तरी योजनांची अंमलबजावणी प्रभावी करण्याबाबत आम्ही सतर्क आहेत. त्यामुळे कोणीही लाभार्थी वंचित राहणार नाही. आगामी काळात योजनांचे स्वरुप सकारात्मक पद्धतीने बदलून अधिकाधिक लाभार्थींपर्यंत पोहोचवण्याचा आमचा संकल्प आहे. सीबीएसई विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे लाभ देण्याबाबत प्रशासन सकारात्मक आहे. त्यावरही आठवडाभरात निर्णय होण्याची शक्यता आहे.
– **अजय चारठाणकर,** उप आयुक्त, समाज विकास विभाग..

# पिंपरी-चिंचवड महापालिका शाळेत 'एक दिवस दप्तरविना'!

## प्रशासनाचा निर्णय : विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद

पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना चालना मिळावी, या उद्देशाने एकदिवस दप्तरविना असा उपक्रम ११० प्राथमिक शाळांमध्ये राबवण्यात येत आहे. महिन्याच्या दर तिसऱ्या शनिवारी हा उपक्रम सुरू करण्यात आल्याची माहिती प्रशासन अधिकारी संजय नाईकडे यांनी दिली.

दररोज दप्तर आणि अभ्यासाचे ओझे विद्यार्थ्यांना कंटाळवाणे होऊ शकते. अशा परिस्थितीत एखादा दिवस विरंगुळ्याचा असला तर नक्कीच उत्साह निर्माण होतो. जुलै महिन्यापासून हा उपक्रम प्रत्यक्ष सुरू करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना कार्यानुभव, चित्रकला, क्रीडा, शारीरिक शिक्षण, कविता, संगीत, मातीकाम या दिवशी घेण्यात येते. यामुळे विद्यार्थ्यांचे सुप्तगुण वाढीला लागतात.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने, मनुष्यबळ विकास मंत्रालय, विभागाने जारी केलेल्या परिपत्रकाद्वारे जारी केलेल्या 'स्कूल बॅग पॉलिसी 2020' च्या अनुपालनाअंतर्गत राज्यातील शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली आहेत.




### कौशल्य व व्यक्तीमत्व विकासावर भर...

शालेय वयापासून विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षणाची सुरुवात होते. हसत-खेळत ताणविरहीत शिक्षण घेणे शक्य होईल. कला कौशल्यांकडे सध्याच्या काळात दुर्लक्ष केले जाते; मात्र व्यक्तिमत्त्व विकासात या विषयांना मोठे महत्व आहे. त्याचा एकंदर जडणघडणीवर परिणाम होतो. याच विचाराने दप्तरविरहीत उपक्रमाला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

# ‘शासन आपल्या दारी’: महारोजगार मेळाव्यात 639 उमेदवारांची निवड

## » मेळाव्यामध्ये 1 हजार 29 उमेदवारांची नोंदणी

। पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**छोट्या स्वरुपातील गुंतवणूकीच्या आधारे मोठे कार्य उभारण्याचे काम सहकाराच्या माध्यमातून झाले असून गरीबांचे प्रगतीचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम सहकार क्षेत्राने केले, असे प्रतिपादन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी केंद्रीय सहकारी संस्था निबंधक कार्यालयाच्या डिजीटल पोर्टलच्या उद्घाटन कार्यक्रमात केले.**



डिजिटल पोर्टलचा सर्वाधिक लाभ देशात सर्वात जास्त बहुराज्य सहकारी संस्था असलेल्या महाराष्ट्राला होईल, असेही शाह यावेळी म्हणाले. चिंचवड येथे आयोजित या कार्यक्रमास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सहकार राज्यमंत्री बी.एल.वर्मा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, पालकमंत्री मंत्री चंद्रकांतदादा पाटील, केंद्रीय सहकार सचिव ज्ञानेश कुमार, विशेष सचिव तथा केंद्रीय निबंधक विजय कुमार, राज्याचे सहकार विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार आदी उपस्थित होते. महाराष्ट्राचा ‘देशाच्या सहकार क्षेत्राची राजधानी’ असा उल्लेख करुन शाह म्हणाले, महाराष्ट्रातूनच सहकाराचे संस्कार देशात पोहोचले. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, धनंजय गाडगीळ, वैकुंठभाई मेहता अनेकांनी सहकार क्षेत्राला पुढे नेले. गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक या राज्यात सहकार क्षेत्राने चांगली प्रगती केली आहे. म्हणूनच केंद्रीय निबंधक कार्यालयाच्या डिजीटायझेशनच्या कार्यक्रमाचा शुभारंभ पुणे येथून करण्यात येत आहे. बहुराज्य सहकारी संस्थांचे कामकाज पाहणाऱ्या केंद्रीय सहकार निबंधकाचे कामकाज पूर्णतः डिजीटल होत आहे. संस्थांना आपल्या कार्यालयातूनच निबंधक कार्यालयाशी संपर्क साधता येणार आहे. सहकारात छोट्या गुंतवणुकीतून मोठे उद्योग उभे राहिले. १०० रुपये गुंतवणूक करणाऱ्या 36 लाख महिलांच्या गुंतवणूकीमुळे 60 हजार कोटी लाभ मिळवणारी अमूल सारखी संस्था उभी राहिली आहे.

### मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

» शासन आपल्या दारी कार्यक्रमात ६९ स्टॉल्सद्वारे शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. या उपक्रमात महिला, युवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.या दालनांमध्ये आरोग्य, कृषी, पशुसंवर्धन, महिला व बालविकास, प्रादेशिक परिवहन कार्यालय, जिल्हा उद्योग केंद्र, केंद्र व राज्य शासन पुरस्कृत आवास योजना तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या योजनांची माहिती देण्यात आली. जि.प.च्या आरोग्य विभागामार्फत डोळ्यांची तपासणी, मोफत आयुष्मान भारत कार्ड विशेष मोहीम, महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत मोफत आरोग्य तपासणी, समाज कल्याण विभागामार्फत शाहू, फुले, आंबेडकर ग्राम अभ्यासिका, दिव्यांग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्याची योजना, यशवंत निवास घरकुल योजना, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर अनुदान आदी योजनांची माहिती देण्यात आली.

---

# मल्हारी मार्तंडाच्या दर्शनासाठी नेत्यांची मांदियाळी

## »जेजुरी गड विकास आराखडा: मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**‘येळकोट येळकोट जय मल्हार’, ‘सदानंदाचा येळकोट’ च्या जयघोषात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज श्री मल्हारी मार्तंडाची पूजा करुन दर्शन घेतले. मुख्यमंत्री श्री.शिंदे यांच्या हस्ते तीर्थक्षेत्र जेजुरी गड विकास आराखड्याच्या एकूण ३४९ कोटी रुपयांपैकी पहिल्या टप्प्यातील १०९ कोटींच्या कामांचे भूमिपूजन करण्यात आले.**



यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, आमदार राहुल कुल, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माजी राज्यमंत्री विजय शिवतारे तसेच जेजुरी देव संस्थानचे विश्वस्त पोपटराव खोमणे, ॲड. पांडुरंग थोरवे, ॲड.विश्वास पानसे, अनिल सौंदडे, मंगेश घोणे, राजेंद्र खेडेकर, अभिजित देवकाते आदी उपस्थित होते.श्री मार्तंड देव संस्थान आणि ग्रामस्थांच्या वतीने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचा शिंदेशाही पगडी, घोंगडी आणि काठी देऊन यावेळी सत्कार करण्यात आला. एकूण ३४९ कोटी रुपये खर्चाच्या श्री क्षेत्र जेजुरी गड तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास राज्य शासनाने यापूर्वीच मंजूरी दिली आहे.

### सुशोभीकरण यासाठी सुमारे 109 कोटी

» जेजुरी शहरातील लवथळेश्वर, मल्हार गौतमेश्वर व बल्लाळेश्वर मंदिरे, प्राचीन जलव्यवस्थापन होळकर व पेशवे तलाव, जननी तीर्थ व इतर कुंडे, बारवांची जतन व दुरुस्ती, कडे पठारावर जाणाऱ्या मार्गावरील जुन्या वास्तूंचे जतन, मार्गावरील पायऱ्या व मार्गाचे मजबुतीकरण करण्यात येणार आहे. परिसर नियोजनाची कामेसुद्धा प्रस्तावित करण्यात आली आहेत. याबरोबरच पायाभूत व्यवस्था, परिसर व्यवस्थापन व पर्यटक सुविधा, सुशोभीकरण यासाठी सुमारे १०९ कोटी रुपये पहिल्या टप्प्यात खर्च करण्यात येणार आहेत.

# दिघी, बोपखेलकरांना दिलासा?

## तहसील कामांसाठी पायपीठ थांबणार : आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा

### पिंपरी-चिंचवड तहसीलमध्ये समावेश करण्यासाठी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना निवेदन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिघी व बोपखेल ही गावे हवेली तालुक्यातून वगळून पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालयातील सज्जांना जोडण्याबाबत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे उत्पन्न व रहिवाशी दाखला, जातीचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र यांचे पोर्टल हवेली व पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालय एकत्र असल्यास विद्यार्थी तसेच नागरिकांना दिलासा मिळणार आहे.**

याबाबत राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील गावे दिघी व बोपखेल ही गावे यापूर्वी हवेली तहसील कार्यालय, जि. पुणे अंतर्गत येत होती. मागील काही कालावधीमध्ये सदर गावे अभिलेख सहीत पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालयाअंतर्गत संलग्न केली आहेत. परंतु सदर गावे हवेली तहसील कार्यालयाच्या हद्दीतील सजात समाविष्ट असल्याने गाव पिंपरी चिंचवड मधील पण तलाठी आस्थापना हवेलीकडे अशी अवस्था असल्याने या तलाठी कर्मचारी यांचेवर नियंत्रण ठेवणे कठीण होते. उत्पन्न व रहिवाशी दाखला, जातीचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र यांचे पोर्टल हवेली व पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालय एकत्र असल्याने विद्यार्थ्यांना तसेच नागरिकांना सदरील दाखले काढण्याकरीता पोर्टलवर ताण येऊन नाहक मन:स्ताप सहन करावा लागत आहे.

तसेच, शालेय महाविद्यालयांतील प्रवेशावेळी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांकरीता अनेक महिन्यांची वाट पाहवी लागते. त्यानुसार हवेली तहसील कार्यालय व पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालय यांचे पोर्टल स्वतंत्र करणे गरजेचे आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील ज्येष्ठ महिला व ज्येष्ठ नागरिक, विकलांग, अपंग यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळण्याकरीता हवेली तालुका तहसील कार्यालय, पुणे येथे जावे लागते.

त्यांना या कामी अनेक दिवस हेलपाटे मारावे लागतात. सदरचा लाभ घेण्याकरीता त्यांना शहरापासून दूर जावे लागत असल्याने लोकप्रतिनिधी व प्रशासनावरील रोष दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसते. पिंपरी-चिंचवड शहरातील महसूली अभिलेख अद्यापही हवेली तालुक्यामध्ये असल्याने कार्यालयीन कामकाजावर ताण येतो, असेही आमदार लांडगे यांनी निवेदनात म्हटले आहे. सबब , अपर तहसील कार्यालय याना अतिरिक्त कर्मचारी वर्ग देऊन अभिलेख , संजय गांधी योजनेचे स्वतंत्र डेस्क या कार्यालयात निर्माण कारणेचीही मागणी केली आहे.





“ हवेली तालुक्यातील पिंपरी-चिंचवड शहराशी संबंधीत सर्व अभिलेख पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालयाकडे हस्तांतर करण्यात यावे. त्यामुळे नागरिकांची ओढाताण होऊन आर्थिक वेळेचे नुकसान होणार नाही. विशेष म्हणजे, सर्वांना एकाच ठिकाणी सर्व सरकारी सुविधा मिळण्याकरिता सोयीचे होईल. बोपखेल व दिघी ही गावे सज्जासहीत पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालयाशी संलग्न करण्यात यावे, अशी मागणी राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे मागणी केली आहे. त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा आहे.

– **महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा.

---

# महापालिका विद्यार्थ्यांचे होणार मूल्यांकन!

## आयुक्त शेखर सिंह यांची माहिती : शिक्षकांची गुणवत्ताही तपासणार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे गुणवत्ता मुल्यांकन करण्यासाठी नेमलेल्या भारतीय गुणवत्ता परिषद संस्थेकडून विद्यार्थ्यांचे मुल्यांकन सुरू करण्यात आले असून आतापर्यंत २३ महापालिका शाळांमधील ४ हजार पेक्षा अधिक विद्यार्थ्यांचे मुल्यांकन करण्यात आले आहे, अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.**

विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे बारकाईने निरीक्षण तसेच मुल्यांकन करण्यासाठी महापालिकेने हा उपक्रम हाती घेतला आहे. यामध्ये मराठी, इंग्रजी, गणित, विज्ञान, पर्यावरण अभ्यास या विषयांचा तसेच उर्दू माध्यमातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागातंर्गत महापालिकेच्या ११० प्राथमिक व १८ माध्यमिक शाळा कार्यरत आहेत. या शाळांमध्ये ५५ हजारपेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असून विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देण्यासाठी महापालिका विविध उपक्रमांचे आयोजन करत असते.




आयुक्त शेखर सिंह म्हणाले, विद्यार्थी आणि शिक्षकांचे मूल्यमापन महापालिकेच्या शाळांच्या शिक्षण व्यवस्थेतील परिवर्तनाच्या प्रवासाची सुरुवात आहे. मुल्यमापनाद्वारे विद्यार्थ्याचा कल ओळखून त्यावर प्रभावीपणे काम करणे हा या मागचा हेतू आहे. शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला आणि शेवटी केल्या जाणाऱ्या मुल्यमापनामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात आणि कौशल्यामध्ये भर पडत असून भारतीय गुणवत्ता परिषदेच्या सहाय्याने निःसंशयपणे महापालिकेला प्रभावी शैक्षणिक धोरण आखण्यास मदत मिळेल. सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात म्हणाले, विद्यार्थ्यांचे मुल्यांकन झाल्यानंतर सविस्तर अहवाल त्यांच्या पालकांना पाठविण्यात येणार आहे

### विद्यार्थ्यांचा कल ओळखण्यास मदत होणार

**अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील म्हणाले, महापालिका शाळांच्या मुल्यांकनाद्वारे आलेल्या निकालांचे विश्लेषण करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्षमतेत सुधारणा करण्यासाठी योग्य कृती आराखडा तयार करणे गरजेचे आहे. त्यासाठी महापालिकेने हा उपक्रम राबविण्याचे ठरविले असून या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांचा कल ओळखण्यास आणि शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यास शिक्षण विभागाला मदत होणार आहे.**



**भूमिका**

**जाहीरपणे विधेयक फाडणारे शीघ्रकोपी राहुल गांधी आज संयमी झाले आहेत. देश तोडणाऱ्या द्वेषाच्या विचारसरणीला उत्तर म्हणून, त्यांनी भारत जोडणारं 'मोहब्बत की दुकान' सुरू केलं. मोदी आडनावाची बदनामी केली असा आरोप करत त्यांची खासदारकी रद्द केली गेली. पण सुप्रीम कोर्टानं त्यांच्या खासदारकीचा मार्ग पुन्हा मोकळा करून विरोधकांना चपराक दिलीय.**

# राहुल गांधींना 'पप्पू' ठरवण्यात आलं



आता त्यांच्याकडून सत्ताबदलाची अपेक्षा बाळगली जातेय. भारतात ब्रिटिश अंमल जारी करण्यासाठी सहाय्यभूत ठरलेले विचारवंत सर जॉन स्ट्रॅची यांनी केंब्रिजमध्ये भारताबद्दल अनेक व्याख्याने दिली होती. ती पुस्तकरूपाने 'इंडिया' या शीर्षकाखाली प्रसिद्ध करण्यात आली आहेत. स्ट्रॅची यांनी बरीच वर्षे भारतीय उपखंडात काढली होती आणि नंतर त्यांना गव्हर्नर जनरलच्या सल्लागार मंडळाचे सदस्य करण्यात आले. 'इतिहासकाळात भारत नावाचे एक राष्ट्र कधीही नव्हते आणि भविष्यातही कधी असणार नाही', असे उद्गार स्ट्रॅची यांनी काढले होते.

हिंदुस्थान्यांची स्वयंशासन करण्याची पात्रता नसून, त्यांना कह्यात ठेवण्यासाठी ब्रिटिश राज्यकर्त्यांची आवश्यकता आहे, असे चर्चिलने म्हटले होते. परंतु भारताने स्वातंत्र्य मिळवले आणि लोकशाहीचा यशस्वी प्रयोग करून दाखवला. लोकशाहीत सत्ताधाऱ्यांप्रमाणेच विरोधी पक्षांचे आणि त्यांच्या नेत्यांचेही महत्त्व असते. लोकशाही जिवंत आणि चैतन्यशील राहण्यासाठी विरोधी पक्ष आवश्यक असतात.

पण गेल्या दहा वर्षात लोकशाहीसाठी आवश्यक विरोधी पक्ष संपवला गेलाय. २०१४ पासून भारतात प्रचंड बहुमत मिळवलेल्या भाजपचं राज्य असून, विरोधी पक्ष पूर्णतः दुबळा झालेला आहे. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकांत काँग्रेसचा दारुण पराभव झाला. काँग्रेसची जागा घेईल असा दुसरा राष्ट्रीय पक्ष देशात नाही. सोनिया गांधी या जवळपास २२ वर्षे काँग्रेसचे अध्यक्ष होत्या आणि २००४ पासून राजकारणात सक्रिय असलेले राहुल गांधी २०१७ ते १९ या कालावधीत काँग्रेसचे अध्यक्ष होते.

सोनिया गांधी काँग्रेसच्या दीर्घकाळ अध्यक्ष आणि २०१९ ते २०२२ या दरम्यान हंगामी अध्यक्ष होत्या. तेव्हा पक्षात राहुल यांचाच प्रभाव होता. २००९ मध्ये लोकसभेत काँग्रेसच्या जागा २०६ होत्या. त्या २०१४ मधे ४४ पर्यंत खाली आल्या आणि २०१९ मधे ५२ जागा आल्या. २००९ मधे काँग्रेसचा लोकसभा निवडणुकांतील मतदानाचा हिस्सा सुमारे २८ टक्के होता. तो २०१४ मधे १९ टक्क्यांवर आला आणि २०१९ मधे जवळपास तेवढाच राहिला.

उलट भाजपने २००९ मधे १९ टक्के मतदान हिस्सा होता, तो २०१९ पर्यंत ३७ टक्क्यांपर्यंत वाढवला. काँग्रेसमधे राहुल यांचा प्रभाव असताना २०१४ ते २०२२ या काळात ४६० महत्त्वाचे नेते पक्षातून बाहेर पडले, त्यापैकी १७० खासदार किंवा आमदार होते. २०१४ पासून विविध राज्यांत ज्या ४५ विधानसभा निवडणुका झाल्या, त्यापैकी ४० निवडणुकांत काँग्रेसचा पराभव झाला. राहुल गांधी यांनाच या पराभवासाठी जबाबदार धरण्यात आले आणि त्यांना 'पप्पू'ही ठरवण्यात आले. समाजमाध्यमांतून ट्रोलर्सनी राहुल यांची सतत हुर्यो उडवली. पण कोणत्याही क्षेत्रात, मग ते क्रीडा, चित्रपट किंवा राजकारणाचे क्षेत्र असो, हार न मानता चिकाटी आणि जिद्द दाखवली, तर माणसाला कधी ना कधी यश मिळतेच. उदाहरणार्थ, भारताचा आघाडीचा गोलंदाज जसप्रीत बुमराह हा दुखापतीमुळे एक वर्ष खेळापासून दूर होता. परंतु आता त्याचं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधे पुनरागमन झाले आहे.

अमिताभ बच्चनचे पहिले सहाही चित्रपट आपटले होते, परंतु नंतर मात्र तो हिमतीने सुपरस्टारपदापर्यंत पोहोचला. त्याचप्रमाणे राहुल गांधींची पप्पू आणि अयशस्वी, कामात सातत्य न ठेवणाऱ्या नेत्याची प्रतिमा आता पुसली गेली आहे.

यापूर्वी राहुल यांना 'शहजादा'. असे संबोधले जात होते. घराणेशाहीचा त्यांना लाभ मिळतो, अशी टीका केली जात असे. २०१९ च्या पराभवानंतर राहुल यांनी स्वतःहून पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा दिला. अपयशाची जबाबदारी स्वीकारली आणि अनेकदा आग्रह होऊनदेखील पक्षाध्यक्षपद पुन्हा स्वीकारले नाही. उलट मल्लिकार्जुन खरगे यांना पक्षाध्यक्षपद देण्यात आल्यामुळे काँग्रेसवरील घराणेशाहीचा आरोप हळूहळू मागे पडला आहे. त्याचप्रमाणे पक्षांर्गत बैठकीत अथवा 'इंडिया'च्या बैठकांत राहुल हे खरगे यांच्या नेतृत्वाखालीच काम करतात.

## संपादकीय »

# निकाल ते निकाल

***सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल ते २०२४ मधील लोकसभा निवडणुकांचा निकाल; अशी एक चित्तथरारक राजकीय घडामोडींची पटकथा आता उलगडत जाणार आहे.***

सर्वोच्च न्यायालयाने काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांना देण्यात आलेल्या दोन वर्षांच्या शिक्षेला स्थगिती दिल्यामुळे काँग्रेसमध्ये देशभरात जे उत्साहाचे वारे संचारले आहे, ते स्वाभाविक आहे. या खटल्यात राहुल यांनी संघर्षाची भूमिका घेतली होती आणि हा लढा सुरत न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेला. राहुल गांधी यांचे लोकसभेचे सदस्यत्व रद्द झाले. त्यांनी खासदार म्हणून मिळालेला बंगलाही सोडला. या निकालानंतर लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला राहुल यांना याच अधिवेशनात त्यांची खासदारकी परत करतात का; याचे औत्सुक्य आहे. त्यांचे लोकसभा सदस्यत्व रद्द करताना जी चपळाई दाखविण्यात आली; तशी ती आता दाखविली नाही तर त्याचा राजकीय फायदा उघडच राहुल यांना होईल. 'भारत जोडो यात्रा' काढल्यापासून राहुल गांधी यांची देशव्यापी झपाट्याने प्रतिमा बदलत आहे.

**माथाडी कायद्याच्या जाचातून उद्योगांची सुटका करण्याचे स्वागतार्ह पाऊल राज्य सरकारने उचलले होते, पण राजकीय दबावापुढे ही सुधारणा नुकत्याच संपलेल्या पावसाळी अधिवेशनात अमलात येऊ शकली नाही. माथाडी कामगार कायदा तसेच कीटकनाशके वा बियाणांची भेसळ रोखणे आणि वाळूमाफियांना आळा घालण्यासाठी कायदा करण्यासाठी सरकारने विधेयके विधिमंडळात सादर केली होती.**

# 'माथाडी नेते' मोकाटच..!

पण ही महत्त्वाची विधेयके विधिमंडळाच्या उभय सभागृहांच्या चिकित्सा समितीकडे विचारार्थ सोपविण्यात आली. आता विधानसभा व विधान परिषदेच्या आमदारांचा समावेश असलेली ती समिती या विधेयकांवर 'अभ्यास' करील. मग विधेयकांचे मसुदे आहे त्या स्वरूपात ठेवावेत की काही बदल करावेत, हे ठरेल. हिवाळी अधिवेशनात हे बदल अमलात आले तर ठीक. कारण पुढील वर्ष लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकांचे असल्याने शिस्त लावणारे- पर्यायाने अनेकांचे हितसंबंध दुखावणारे- कायदे होण्याची शक्यता कमी.

यापैकी माथाडी कामगारांविषयीचे विधेयक उद्योग-जगतासाठीही महत्त्वाचे होते. राज्याच्या विविध औद्योगिक पट्ट्यांमध्ये राजकीय नेत्यांनी पोसलेल्या माथाडी टोळ्यांनी धुमाकूळ घातला आहे. कोणताही माल चढविणे वा उतरविण्यासाठी



अवाच्या सवा पैशांची मागणी केली जाते. यांत्रिक उपकरणांचा वापर केला तरी पैसे माथाडींचेच मागितले जातात. वास्तविक नोंदणीकृत माथाडी कामगारांकडून काम करून घ्यावे, अशी तरतूद कायद्यात आधीपासून आहे. पण स्वयंघोषित माथाडी कामगारांच्या नेत्यांनी अनधिकृतपणे आपल्या टोळ्या निर्माण केल्या आहेत. या माथाडी कामगार व त्यांच्या नेत्यांच्या दहशतीमुळे उद्योजक हैराण आहेत. नवी मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर आदी परिसरांत स्वयंघोषित माथाडी नेत्यांनी उद्योजकांकडून खंडणी वसुलीचे सत्र सुरू केले आहे. नवी मुंबईत तर छोट्या गाळेधारकांकडूनही पैसे वसूल करण्याचे उद्योग या माथाडी नेत्यांनी केले आहेत. पण नेतेमंडळी या माथाडी कामगारांच्या नावाखाली गब्बर होत असताना, दहा ते बारा तास राबणाऱ्या गरीब माथाडी कामगारांची पिळवणूक केली जाते. माथाडी कामगारांच्या नावाखाली हप्तेबाजी, खंडणीवसुली करणारे नेते सर्वच पक्षांमध्ये आहेत. माथाडी कामगारांच्या संघटना, झोपडपट्टी पुनर्वसन योजना अशी काही कामे राजकीय पक्षांच्या नेत्यांसाठी सोयीची ठरतात. हातात पैसा खेळत असल्याने या मंडळींच्या उद्योगांकडे सर्वच पक्षांचे धुरीणसुद्धा पुरेसे लक्ष देत नाहीत. माथाडी नेत्यांच्या या मनमानी व दादागिरीमुळे उद्योजकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. उद्योजकांच्या संघटनांनी आपली कैफियत सर्वच पक्षांच्या नेत्यांच्या कानी घातली. या माथाडी कामगारांना आवरले नाही तर महाराष्ट्रात उद्योग टिकणे कठीण असल्याकडे उद्योजकांनी सरकारी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले होते.

## ।। अभंगवाणी ।।



मरणाही आधीं राहिलों मरोनी ।
मग केलें मनीं होतें तैसें ॥१॥

आतां तुम्ही पाहा आमुचें नवल ।
नका वेचूं बोल वांयांविण ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अजित पवारांनी पक्षावर दावा ठोकणे अकाली अन् दुर्दैवी

## »2 गट नाहीत : शरद पवार गटाचे EC पुढे स्पष्टीकरण

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**अजित पवार यांच्या बंडाळीमुळे राष्ट्रवादी काँग्रेसची 2 शकले पडली आहेत. हे सर्वश्रुत आहे. पण पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी मात्र आपल्या पक्षात कोणताही गट अन् वाद नसल्याचे स्पष्ट केले आहे. निवडणूक आयोगाच्या नोटीसीला दिलेल्या स्पष्टीकरणात त्यांनी हा दावा केला आहे.**

त्यांच्या दाव्यामुळे निवडणूक विश्लेषकांच्या भुवया उंचावल्यात. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाने नुकतेच निवडणूक आयोगाला एक पत्र पाठवले होते. त्यात राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदी अजित पवार यांची निवड करण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता. या पत्रावर निवडणूक आयोगाने शरद पवार गटाला पत्र पाठवून आपली बाजू स्पष्ट करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार, पवारांनी पाठवलेल्या आपल्या उत्तरात आपल्या पक्षात कोणतेही गटतट नसल्याचा दावा केला आहे. शरद पवारांच्या गटाने निवडणूक आयोगापुढे म्हटले आहे



की, अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या चिन्हावर दावा ठोकणे अकाली व दुर्दैवी आहे. ही मागणी आयोगाने फेटाळली पाहिजे. यासाठी या गटाने पक्षात कोणतेही गटतट नसल्याचा तर्क मांडला आहे. अजित पवार यांच्या याचिकेतून राष्ट्रवादीत 2 उभे गट पडल्याचे कोणतेही पुरावे नाहीत. राष्ट्रवादीत कोणता वाद आहे हे सिद्ध करण्यास अजित पवार सकृतदर्शनी सक्षम नाहीत. प्रथम दर्शनी निवडणूक आयोगानेही राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष शरद पवार यांच्या पक्षात व अजित पवार यांच्या गटात वाद असल्याचे सिद्ध केले नाही. एवढेच नाही तर 1 जुलै 2023 पूर्वी अजित पवारांनी शरद पवार अथवा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाविरोधात कोणतीही तक्रार केली नव्हती. तसेच शरद पवार किंवा पक्षाच्या अन्य कोणत्याही नेत्यांच्या बैठकीत त्यांनी विरोधही केला नव्हता, अशी बाब शरद पवार यांच्या गटाने निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आणून दिली आहे.

### सेनेच्या मार्गाने राष्ट्रवादीच्या नेतृत्वाचा लढा

» राष्ट्रवादी काँग्रेसमधील नेतृत्वाचा लढा शिवसेनेच्या मार्गाने जात आहे. शिवसेनेसारखाच अजित पवार यांनी पक्षावर दावा सांगितला आहे. राष्ट्रवादीचे बहुतांश आमदार अजित पवारांच्या गोटात आहेत. त्यामुळे त्यांच्याच गटाला पक्षाचे नाव व चिन्ह देण्यात यावे, असे त्यांचे म्हणणे आहे. विशेषतः 30 जून 2023 रोजी झालेल्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष म्हणून अजित पवारांची निवड करण्यात आल्याचा दावा अजित पवार गटाने निवडणूक आयोगाकडे केला होता. यासंबंधीच्या पत्रावर पक्षातील बहुतांश सदस्यांनी स्वाक्षऱ्या केल्या होत्या.

---

# भाजपचे पालकमंत्री सावे विरोधात शिंदे गट आक्रमक

## » सावे यांना घेराव घालून अडवले; जाब विचारत घोषणाबाजी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**जिल्हा नियोजन समितीच्या अंतर्गत विकासकामांना निधी देताना डावलण्यात येत असल्याचा आरोप करून शिवसेनेच्या (शिंदे) पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारातच भाजपचे पालकमंत्री अतुल सावे यांना घेराव घालून अडवले आणि जाब विचारत घोषणाबाजी केली.**

त्यामुळे मोठा गोंधळ उडाला आणि ढकलाढकली झाली. तालुका जालना पोलिसांनी हस्तक्षेप करून शिवसेनेच्या (शिंदे) कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाचे मुख्य प्रवेशद्वार बंद करून जिल्हा नियोजन समितीच्या लहान गटाची बैठक घेण्यात आली. सावे बाहेर पडेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाचे मुख्य प्रवेशद्वार बंदच ठेवण्यात आले. तालुका जालना पोलिसांनी शिवसेनेचे (शिंदे) जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे आणि मोहन अग्रवाल, जिल्हा उपप्रमुख संतोष मोहिते, योगेश रत्नपारखे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना तालुका जालना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर गोंधळाची परिस्थिती निवळली. यावेळी कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे जिंदाबादच्या घोषणा दिल्या. जमावबंदी भंग केल्याबाबत या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतल्याचे पोलीस निरीक्षक सचिन सांगळे यांनी सांगितले. यासंदर्भात भुतेकर यांनी सांगितले की, जिल्हा नियोजन समितीच्या अंतर्गत निधी



वितरीत करताना पालकमंत्री सावे शिवसेनेवर (शिंदे) अन्याय करीत असून वरिष्ठ पातळीवर ठरलेल्या सूचनांचे पालन करीत नाही. अनेकदा बोलूनही सावे आमच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करीत आहेत. आमचा पक्ष राज्यात सत्तेत असूनही विकासकामांच्या निधीत आम्हाला सहभागी करवून घेतले जात नाही. ठरल्यानुसार जिल्हा नियोजित समितीच्या सदस्यपदी आमच्या पदाधिकाऱ्यांची नावे घेण्यात येत नाहीत. त्याचप्रमाणे तालुका पातळीवरील शासकीय समित्यांच्या सदस्यांच्या नियुक्त्याही पालकमंत्री करीत नाहीत. पालकमंत्री सावे जाणूनबुजून शिवसेनेकडे (शिंदे) दुर्लक्ष करीत असल्याने आमच्या कार्यकर्त्यांत त्यांच्याविरुद्ध प्रचंड रोष निर्माण झालेला आहे. या रोषातून जिल्हा नियोजन समिती बैठकीस आलेल्या सावे यांना विचारणा केली असता त्यांनी व्यवस्थित उत्तरे दिली नाहीत. त्यामुळे कार्यकर्ते संतप्त झाले आणि घोषणा देण्यास सुरुवात झाली. पालकमंत्री सावे यांनी या संदर्भात वार्ताहरांना सांगितले की, शिंदे गटासाठी १४ कोटींची निधी दिला आहे. निधी पक्षासाठी नसतो तर लोकप्रतिनिधीसाठी असतो. तरीही सत्तेतील सहकारी म्हणून निधी दिला आहे. जिल्हा नियोजन समितीमधील सदस्य नियुक्त्यांबद्दल आपण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार आहोत. कारण आता आमच्यासोबत अजित पवार यांचा राष्ट्रवादी पक्षही आलेला आहे.

### अर्जुन खोतकर पोलीस ठाण्यात

» ताब्यात घेतलेल्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची शिवसेनेचे (शिंदे) उपनेते अर्जुनराव खोतकर यांनी तालुका जालना पोलीस ठाण्यामध्ये जाऊन भेट घेतली. त्यानंतर माध्यम प्रतिनिधींशी बोलताना खोतकर म्हणाले, जिल्हा नियोजन समितीचे निधी वितरण करताना पालकमंत्र्यांकडून भेदभाव होत असल्याची आमच्या कार्यकर्त्यांची तक्रार आहे. पालकमंत्री आपल्याकडे दुर्लक्ष करतात, या भावनेतून पदाधिकारी आणि कार्यकर्ते त्यांच्याकडे विचारणा करण्यासाठी गेले होते. या संदर्भात आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलणार आहोत. पुण्यावरून येत असताना या संदर्भातील माहिती मिळाली आणि त्यानंतर ताब्यात घेतलेल्या पदाधिकाऱ्यांनी तालुका जालना पोलीस ठाण्यात येऊन भेट घेतली आणि त्यांचे म्हणणे ऐकून घेतले, असे खोतकर म्हणाले.

# राज्यसभेत दिल्ली विधेयक मंजूर

## » 'आप'ला धक्का : अमित शहा विरोधकांवर कडाडले

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्र सरकारने सोमवारी राज्यसभेत मांडलेले दिल्ली सेवा विधेयक राज्यसभेत मंजूर करण्यात आले. स्वयंचलित मतदान यंत्रात बिघाड झाल्याने स्लिपद्वारे मतदान झाले. बाजूने 131 तर विरोधात 102 मते पडली. हे विधेयक आता राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी जाईल, त्यानंतर त्याचे कायद्यात रुपांतर होईल. दिवसभराच्या चर्चेनंतर गृहमंत्री अमित शहा उत्तर देण्यासाठी आले असता त्यांनी विरोधकांना हे विधेयक पाडण्याचे आव्हान दिले.**

शहा म्हणाले- लोकसभेत 8 ते 10 ऑगस्ट दरम्यान अविश्वास प्रस्तावावर चर्चा होणार आहे, त्यामुळे विरोधकांनी 11 ऑगस्टला मणिपूरवर चर्चा करावी. मी मणिपूरवर चर्चा करण्यास तयार आहे. आमच्याकडे लपवण्यासारखे काही नाही. तुमच्याकडे (विरोधक) काहीतरी लपवायचे आहे. तुम्ही चर्चा होऊ देत नाही. 11 ऑगस्टला जर खर्गे यांनी चर्चेसाठी होकार दिला तर मीही त्यासाठी तयार आहे. यापूर्वी, दिल्ली सेवा विधेयकावर शहा म्हणाले की, हे विधेयक पूर्वीसारखे पंतप्रधानांचे सदस्यत्व वाचविण्यासाठी आणलेले नाही. आणीबाणीसाठी नाही आणले. शहा यांनी असे सांगताच काँग्रेसचे सदस्य संतप्त झाले. त्यावर शहा म्हणाले- काँग्रेसला लोकशाहीवर बोलण्याचा अधिकार नाही. तुम्ही देशाला आणीबाणी दिली होती. काँग्रेसला शिव्या देऊन 'आप'चा जन्म झाला. खरगे साहेब, तुम्ही या विधेयकाला विरोध करत आहात कारण जी युती वाचविण्यासाठी तुम्ही पाठिंबा देत आहात ते केजरीवाल तुमच्याकडे पाठ फिरवतील. एकट्याने काहीही होणार नाही हे काँग्रेसला माहीत आहे. त्यामुळेच युती झाली आहे.

तत्वतः एकी नसलेली युती. केरळमध्ये काँग्रेस आणि डावे एकमेकांच्या विरोधात असले तरी युतीमध्ये इल्लू-इल्लू करत आहेत. डाव्यांच्या विरोधात तृणमूल काँग्रेसचा जन्म झाला, पण तेही एकत्र आहेत. मी त्यांना सांगतो की, आणखी 4-5 पक्ष जोडले गेले तरी 24 मे 2024 रोजी फक्त नरेंद्र मोदीच पंतप्रधानपदाची शपथ घेतील. शहा म्हणाले- दिल्लीत भ्रष्टाचारमुक्त कारभार सुरळीत व्हावा, हा या विधेयकाचा उद्देश आहे. विधेयकातील एका तरतुदीने पूर्वीच्या व्यवस्थेत एक इंचही बदल केला जात नाही. आज दिल्ली आहे, उद्या ओडिशाची पाळी आहे, मग दुसऱ्या राज्याची पाळी येईल असे म्हणणारे. हे चुकीचे आहे. ही मानसिकता बदलायला हवी. दिल्ली ही राष्ट्रीय राजधानी आहे. यावर कोणाचाही आक्षेप नसावा. दिल्लीत मदनलाल खुराना, साहिब सिंग वर्मा, सुषमा स्वराज्य, शीला दीक्षित हे मुख्यमंत्री होते. केंद्राशी समन्वय साधण्यात कोणालाही अडचण आली नाही. ट्रान्सफर पोस्टिंगमध्ये कोणालाच अडचण आली नाही. मात्र आंदोलनातून स्थापन झालेल्या सरकारला यामुळे अडचणींचा सामना करावा लागला. केंद्राची सत्ता वाढवण्यासाठी आम्ही ही विधेयके आणली, असे त्यांना वाटते. आम्ही तुम्हाला सांगू इच्छितो की या देशातील जनतेच्या आशीर्वादामुळे आम्ही मजबूत आहोत.

सुप्रीम कोर्टाने केंद्राला पोलिस आणि सार्वजनिक सुव्यवस्थेवर काम करण्याचे अधिकार दिले, राज्याला सेवेचा अधिकार देण्याबाबत बोलले. तसेच केंद्र सरकारला कोणत्याही विषयावर कायदा करण्याचा अधिकार असल्याचे म्हटले आहे. केंद्राला कोणत्याही विषयावर कायदे करण्याचा अधिकार आहे, असे राज्यघटनेत म्हटले आहे. सेवा देखील या श्रेणीत येतात. संसदेला घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार आहे. काँग्रेस सुरुवातीपासूनच दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा देण्याच्या विरोधात आहे. काँग्रेसनेच घटनादुरुस्ती करून दिल्लीच्या अधिकारांचे उल्लंघन केले आहे. आम आदमी पक्षाच्या मांडीवर बसण्यासाठी काँग्रेस स्वतःच्याच कायद्याला विरोध करत आहे. 11 मे रोजी 3-4 वाजता सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाचा निर्णय आला.

या आदेशाची नियमित खंडपीठाकडून अंमलबजावणी करण्यात येणार होती. त्या आदेशाची अंमलबजावणीही झाली नाही की सायंकाळी 5.30 वाजता आम आदमी पक्षाच्या सरकारने बदली सुरू केली. त्याची माहिती सोशल मीडियावर येऊ लागली. आप सरकारच्या मंत्र्यांनी दक्षता विभागाकडे फाईल्स मागवायला सुरुवात केली. त्यांनी दक्षता विभागातील दिल्ली दारू घोटाळ्याचे पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी झालेल्या बेहिशेबी खर्चाच्या तपासाची फाईलही दक्षता विभागाकडे होती.



### आप आणि काँग्रेसने व्हिप जारी केला होता

» काँग्रेस आणि आपने त्यांच्या खासदारांना राज्यसभेत उपस्थित राहण्यासाठी व्हिप जारी केला होता. त्याचवेळी आपचे खासदार राघव चड्ढा, काँग्रेसचे खासदार जेबी माथेर आणि नसीर हुसैन यांनी मणिपूरच्या मुद्द्यावर राज्यसभेत चर्चा करण्यासाठी नियम 267 अंतर्गत नोटीस दिली.

# कोर्टाने चित्त्यांच्या मृत्यूची सुनावणी बंद केली

## » सरकारला प्रश्न विचारण्याचे कारण नाही : सुप्रीम कोर्ट

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मध्य प्रदेशातील कुनो नॅशनल पार्कमध्ये 9 चित्त्यांच्या मृत्यूप्रकरणी सोमवारी सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली. देशात चित्त्यांच्या पुनर्वसनात काही समस्या आहेत, पण काळजी करण्यासारखे काही नाही, असे केंद्राने न्यायालयाला सांगितले. न्यायालयाने केंद्राचा युक्तिवाद ग्राह्य धरून सुनावणी थांबवली.**

भारतात चित्त्यांचे पुनर्वसन करण्याच्या प्रकल्पावर सरकारला प्रश्न विचारण्याचे कारण नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. नामिबिया आणि दक्षिण आफ्रिकेतून वीस चित्ते कुनो येथे आणण्यात आले आहेत. त्यानंतर भारतात चार पिले जन्माला आली. त्यापैकी 6 चित्ते आणि तीन पिलांचा मृत्यू झाला आहे. यासंदर्भात याचिका दाखल करण्यात आली होती. सुनावणीदरम्यान केंद्राने म्हटले की, जगात प्रथमच चित्ता एका खंडातून दुसऱ्या खंडात हलवण्यात आला आहे. चित्त्यांच्या आवारात जास्त तापमान असणेदेखील कठिण ठरते आहे. नामिबिया आणि दक्षिण आफ्रिकेच्या कमी तापमानाच्या तुलनेत येथील तापमान जास्त आहे.1952 मध्ये देशातून चित्ता नामशेष झाल्याचे घोषित करण्यात आले. त्यानंतर देशात चित्तांचे पुनर्वसन करण्याच्या योजनेचा एक भाग म्हणून परदेशातून चित्ते आणण्यात आले आहेत. केंद्र सरकारने सांगितले की, भारतातील सर्व आव्हानांनंतर चित्त्यांचा मृत्यूदर जगाच्या इतर भागांच्या तुलनेत खूपच कमी आहे. इतर वन्य प्राण्यांपासून म्हणजे वाघ, बिबट्या, रानडुक्कर यांच्यापासून त्यांना वाचवणे हे मोठे आव्हान आहे.

संसर्ग आणि निर्जलीकरण ही चित्त्यांच्या मृत्यूची प्रमुख कारणे आहेत. या प्रकरणी आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांचे मत घेतले जात आहे.



### चित्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, आमच्या योजनेनुसार देशात दरवर्षी सरासरी 5 ते 8 चित्त्याची पिल्ले जन्माला येतील. सरकार पुढील पाच वर्षांसाठी विदेशातून 12 ते 14 चित्ते आणणार आहे. कुनोमध्ये सध्या एका पिलासह 15 चित्ते आहेत. नामिबियातून आणलेल्या साशा या 4 वर्षांच्या मादीचा किडनीच्या संसर्गाने मृत्यू झाला. वन विभागाने सांगितले की, 15 ऑगस्ट 2022 रोजी नामिबियामध्ये साशाची रक्त तपासणी करण्यात आली, त्यात क्रिएटिनिनची पातळी 400 पेक्षा जास्त होती. दक्षिण आफ्रिकेतून आणलेल्या उदय नावाच्या चित्ताचा मृत्यू झाला. उदयचा मृत्यू हृदयाच्या धमनी निकामी झाल्यामुळे झाल्याचं शॉर्ट पीएम रिपोर्टमध्ये सांगण्यात आले होते. मध्य प्रदेशचे मुख्य वन्यजीव वॉर्डन जेएस चौहान यांनी सांगितले की, हृदयाच्या धमनीत रक्ताभिसरण थांबल्यामुळे चित्ताचा मृत्यू झाला. हा देखील हृदयविकाराचा एक प्रकार आहे.

# मी ते सीन करायला नाही म्हटलं

बाहुबलीमधून ती पहिल्यांदा बॉलीवूडच्या प्रेक्षकांना दिसलेल्या तमन्नाचा अंदाज काही वेगळाच होता. तिची अदा, बोल्डनेस हे त्यावेळी फारसं लक्षात आलं नाही. मात्र गेल्या काही वर्षांपासून तमन्नाचा बोल्ड अंदाज हा आता चर्चेत आला आहे. त्यामुळे सोशल मीडियावरही ती तुफान लोकप्रिय झाली आहे. विजय वर्मा सोबतच्या इंटिमेट सीनमुळे तमन्नाच्या नावाची क्रेझ तयार झाली. लस्ट स्टोरीज २ मध्ये विजय वर्मा आणि तमन्नाचे ते बोल्ड सीन चाहत्यांच्या कौतूकाचा विषय ठरले तर नेटकऱ्यांनी तमन्नावर सडकून टीका केली होती. ज्या अभिनेत्रीनं आपण कधीही कुणासोबत इंटिमेटच काय पण किसिंग सीनही करणार नाही असे म्हटले होते, अशा अभिनेत्री लस्ट स्टोरीजमध्ये त्या गोष्टीचा विसर पडला आणि ती विजय वर्मासोबत इंटिमेट झाल्याचे दिसून आले. नेटफ्लिक्सवर गेल्या महिन्यात प्रदर्शित झालेल्या लस्ट स्टोरीजनं प्रेक्षकांची पसंती मिळवली. कोंकणा सेन शर्मा, रिया कागती, झोया अख्तर यांचे दिग्दर्शन असलेल्या वेगवेगळ्या त्या लघुपटांमध्ये मानवी स्वभाव, मानवाच्या शारीरीक गरजा यावर मोकळेपणानं आणि तितक्याच बिनधास्तपणे भाष्य करण्यात आले होते. त्यात काजोल, मृणाल ठाकूर, विजय वर्मा, तमन्ना भाटिया अंगद बेदी यांच्या भूमिका होत्या. यासगळ्यात तमन्नाची भूमिका आणि तिचा बोल्ड सीन हा सोशल मीडियावर चर्चेत राहिला. पहिल्यांदाच तमन्नानं इतका बोल्ड सीन दिला असेल. ती विजयसोबत एवढी इंटिमेट होईल असे तिच्या चाहत्यांनाही वाटले नसेल. यात आता तिनं दिलेली एक प्रतिक्रिया सध्या व्हायरल होत आहे. यामध्ये तमन्नानं मोकळेपणानं आपल्या त्या भूमिकेविषयी मत व्यक्त केलं आहे. तमन्ना म्हणते की, मला माहिती आहे मी जी भूमिका त्या चित्रपटात केली त्यामुळे काहींना वाईट वाटले. त्यांनी मला ट्रोलही केले. पण त्यांना मला सांगायचे आहे की, मी जर ती भूमिका करायला नाही म्हटले असते तर आणखी दुसरी कुणी ती भूमिका केली असती आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे मी नाही म्हटल्यावर मला एखाद्या काकूची किंवा मावशीची भूमिका मिळणार होती. अशा शब्दांत तिनं आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

# जॅकलीनला 'ग्रीन सिग्नल'!



बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री जॅकलीन फर्नांडिझ ही आता वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. महाठग सुकेश चंद्रशेखरची दोनशे कोटी रुपयांचा घोटाळा केल्याप्रकरणी ईडी चौकशी सुरु केल्यानंतर त्यात जॅकलीनचेही नाव समोर आले होते. यानंतर तिच्या चाहत्यांना मोठा धक्काही बसला होता. आता पटियाला हाऊस कोर्टानं विशेष न्यायाधीश शैलेंद्र मलिक यांनी जॅकलीनला परदेशात जाण्यास परवानगी दिली आहे. गेल्या काही महिन्यांपासून जॅकलीनला परदेशात जाण्यासाठी ईडीनं प्रतिबंध केला होता. त्यासाठी तिनं अनेकदा कोर्टाकडे दादही मागितली होती. आता कोर्टानं तिला परवानगी दिली आहे. याशिवाय ईडीच्या वकीलांकडून ज्या अटी आणि शर्ती जॅकलीनसाठी ठेवण्यात आल्या होत्या त्या रद्दही केल्या आहेत. जॅकलीनला तिच्या आगामी प्रोजेक्टसाठी अमेरिकेत जाता येणार आहे. जेव्हापासून तिचे नाव सुकेश चंद्रशेखर सोबत घेतले जाऊ लागले तेव्हापासून त्यासगळ्या प्रकरणाचा तिच्या करिअरवर देखील परिणाम झाला होता.

# दीपिकाची रणवीरसाठी फ्रेंडशिप डे पोस्ट



दीपिका पदुकोणने फ्रेंडशिप डेच्या निमित्ताने पती रणवीर सिंगसाठी सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट शेअर केली आहे. पोस्टमध्ये दीपिकाने जिवलग मित्राशी लग्न करण्याच्या आनंदाविषयी लिहिले आहे. तुमच्या जिवलग मित्राशी लग्न करणे हा आयुष्यातील सर्वात मोठा आनंद असतो, असे दीपिकाने लिहिले आहे. दीपिकाने या पोस्टमध्ये रणवीर सिंगला टॅग केले आणि लिहिले - आपल्या बेस्ट फ्रेंडशीच लग्न करायला हवे. मी हे सहज बोलत नाही, तुम्ही ज्या व्यक्तीवर प्रेम करता, ज्याच्यासोबत तुम्ही तुमचे आयुष्य घालवणार आहात त्याच्याशी तुम्ही चांगले मित्र असले पाहिजे. कोणीतरी असा जो नेहमी तुमची ताकद ओळखू शकेल, कोणीतरी ज्याच्याबरोबर तुम्ही मोठ्याने हसू शकता, कोणीतरी जो तुम्हाला पोट धरेपर्यंत हसवू शकेल. दीपिकाने पुढे लिहिले - प्रेम आणि मैत्रीमध्ये समजून घेणे देखील महत्त्वाचे आहे. जो तुम्हाला समजत नाही त्याच्यावर प्रेम करण्यासाठी आयुष्य खूप लहान आहे. ज्याच्यावर प्रेम आहे, त्याच्याशी असे बंधन असावे की मन-मोकळे रडता येईल. आयुष्य तुम्हाला बऱ्याच वेळा निराश करेल, म्हणून तुम्हाला अशा व्यक्तीसोबत राहायला आवडेल जो कठीण काळात तुमच्या पाठीशी उभा राहील, तुमची काळजी घेईल. तिने लिहिले - सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे तुम्ही अशा व्यक्तीवर प्रेम करता जो तुम्हाला मुक्तपणे कसे जगायचे हे शिकवू शकेल. जो तुमच्यावर इतके प्रेम करू शकतो की अथांग महासागरातही तुम्हाला बुडू देत नाही.

# शिल्पा शेट्टीचा सोमवारचा मोटिव्हेशन व्हिडिओ



48 वर्षीय शिल्पा शेट्टी तिच्या फिटनेसमुळे नेहमीच चर्चेत असते. सोमवारी शिल्पाने इंस्टाग्रामवर मंडे मोटिव्हेशनचा एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये ती ॲब्स बनवण्याचा व्यायाम सांगत आहे.

व्हिडिओमध्ये शिल्पा जिममध्ये जोरदार वर्कआउट करताना दिसत आहे. ॲब्स बनवण्यासाठी ती वेगवेगळे व्यायाम करत आहे. यावेळी ती ब्लॅक टँक टॉप आणि प्रिंटेड स्पोर्टी पँटमध्ये दिसली.

व्हिडिओ शेअर करताना कॅप्शनमध्ये लिहिले की, 'एब्स ऑफ स्टीलसाठी रेसिपी'. 47 वर्षीय अभिनेत्रीचा फिटनेस पाहून तिच्या वयाचा अचूक अंदाज लावणे अशक्य आहे.



व्हिडिओवर कमेंट करताना एका यूजरने लिहिले की, 'प्रेरणादायी मॅडम, तुमच्यावर प्रेम आहे'. दुसऱ्याने लिहिले, 'तुम्हाला पाहून आमची कसरत पूर्ण झाली'. तिसऱ्याने लिहिले, 'तुम्ही माझी फिटनेसची प्रेरणा आहात'. शिल्पा शेट्टी लवकरच रोहित शेट्टीच्या इंडियन पोलिस फोर्स या वेबसिरीजमध्ये ॲक्शन अवतारात दिसणार आहे. या वेब सीरिजमध्ये तिच्यासोबत सिद्धार्थ मल्होत्रा आणि विवेक ओबेरॉय हे देखील मुख्य भूमिकेत आहेत.

याशिवाय शिल्पाने 'केडी - द डेव्हिल' देखील साइन केले आहे, ज्यामध्ये ती सत्यवतीची भूमिका साकारणार आहे. या चित्रपटात ध्रुव सर्जा, शिल्पा शेट्टी, व्ही रविचंद्रन आणि संजय दत्त यांच्याही भूमिका आहेत.

# ब्रायन लाराची हकालपट्टी!

## » डॅनियल व्हिटोरी बनला सनरायझर्स हैदराबादचा हेड कोच

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**सनरायझर्स हैदराबादने सोमवारी डॅनियल व्हिटोरीची मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती जाहीर केली. ब्रायन लारासोबतचा संघाचा दोन हंगामांचा करार संपुष्टात आला. न्यूझीलंडचा माजी कर्णधार व्हिटोरी दुसऱ्यांदा आयपीएलमध्ये प्रशिक्षक म्हणून काम पाहणार आहे. यापूर्वी 2014 ते 2018 पर्यंत व्हिटोरीने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे प्रशिक्षकपद भूषवले होते.**





याबाबत SRH ने ट्विटरवर माहिती दिली. संघाने लिहिले की, किवी अनुभवी डॅनियल व्हेटोरी आमच्या संघ एसआरएचमध्ये मुख्य प्रशिक्षक म्हणून सामील झाले आहे.

डॅनियल व्हिटोरी सध्या इंग्लंडच्या T20 लीग द हंड्रेडमध्ये बर्मिंगहॅम फिनिक्स संघाचे प्रशिक्षक आहेत. व्हिटोरीला कोचिंगचा अनुभव आहे. व्हिटोरीने 2015 मध्ये आयपीएल प्लेऑफमध्ये आणि 2016 मध्ये आरसीबीसह अंतिम फेरीत प्रवेश केला होता. व्हिटोरीने अलीकडेच ऑस्ट्रेलिया पुरुष संघाचा सहाय्यक प्रशिक्षक म्हणूनही काम केले आहे आणि बांगलादेशला फिरकी प्रशिक्षक म्हणूनही मदत केली आहे.

लारासोबत विभक्त झाल्याबद्दल, SRHने म्हटले, लारांनी सनरायझर्ससाठी दिलेल्या योगदानाबद्दल धन्यवाद. तुमच्या भविष्यासाठी आम्ही तुम्हाला शुभेच्छा देतो.

IPL 2023 च्या आधी लारांनी टॉम मूडींची मुख्य प्रशिक्षक म्हणून जागा घेतली. वेस्ट इंडिजचा दिग्गज खेळाडू आयपीएल 2022 दरम्यान SRH मध्ये फलंदाजी प्रशिक्षक म्हणून सामील झाला होता. आयपीएल 2023 मध्ये फ्रँचायझी 10 व्या स्थानावर राहिल्यामुळे सनरायझर्सचे मुख्य प्रशिक्षक म्हणून लाराला चांगला वेळ मिळाला नाही.

आयपीएल 2020 आणि 2021 हंगामासाठी ट्रेव्हर बेलिसची जागा घेण्यापूर्वी मूडी हे आयपीएल 2019 मध्ये त्यांचे मुख्य प्रशिक्षक होते.

### नव्या प्रशिक्षकांचे युग सुरुच

» आयपीएल यावर्षी तीन नवीन प्रशिक्षकांची नियुक्ती करत आहे. व्हिटोरीच्या आधी लखनौ सुपर जायंट्सने ऑस्ट्रेलियाचे माजी प्रशिक्षक जस्टिन लँगर यांची नियुक्ती केली आहे. त्याच वेळी, आरसीबीने त्यांचे नवीन मुख्य प्रशिक्षक म्हणून अँडी फ्लॉवरची निवड केली.

# ऑस्ट्रेलियाचा नवा T20 कर्णधार

## » दुखापतग्रस्त कमिन्सला दिली विश्रांती

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**मिचेल मार्शची ऑस्ट्रेलियाचा नवा T20 कर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे. दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर तो संघाचे नेतृत्व करणार आहे. हा संघ दक्षिण आफ्रिकेत 3 टी-20 आणि 5 एकदिवसीय सामने खेळणार आहे. वनडे आणि कसोटी संघाचा कर्णधार पॅट कमिन्सला टी-२० मधून विश्रांती देण्यात आली आहे. जून 2024 मध्ये होणाऱ्या टी-20 विश्वचषकाकडे पाहता मार्शला संघाचा कायमस्वरूपी टी-20 कर्णधारही बनवले जाऊ शकते.**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० संघात डावखुरा वेगवान गोलंदाज स्पेन्सर जॉन्सनला संधी मिळाली आहे. त्याला पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियाच्या संघात स्थान मिळाले. त्याच्यासोबत मॅथ्यू शॉर्ट आणि ॲरॉन हार्डी यांनाही टी-२० संघात स्थान देण्यात आले आहे. शॉर्ट हा बिग बॅश लीगच्या गेल्या मोसमात टूर्नामेंटचा सर्वोत्तम खेळाडू होता, तर हार्डी ऑस्ट्रेलियाच्या एकदिवसीय विश्वचषक संघाचाही भाग आहे. मिचेल मार्शला सध्या टी-20 संघाचा कायमस्वरूपी कर्णधारपद देण्यात आलेले नाही. दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर तो केवळ 3 टी-20 सामन्यांसाठीच कर्णधार असेल. 30 ऑगस्ट, 1 सप्टेंबर आणि 3 सप्टेंबर रोजी दक्षिण आफ्रिकेत 3 टी-20 सामने खेळवले जातील. एकदिवसीय विश्वचषकापर्यंत ऑस्ट्रेलिया पुन्हा एकही टी-२० खेळणार नाही.



विश्वचषकानंतर संघ भारतात फक्त 5 टी-20 मालिका खेळणार आहे. 2022 मध्ये झालेल्या टी-20 विश्वचषकादरम्यान आरोन फिंच संघाचा कर्णधार होता. विश्वचषकानंतर तो निवृत्त झाला.

विश्वचषकानंतर ऑस्ट्रेलियाने एकही टी-20 खेळलेला नाही, त्यामुळे क्रिकेट ऑस्ट्रेलियाने नवीन टी-20 कर्णधाराचे नावही जाहीर केले नाही. आता मिचेल मार्शला कर्णधार बनवण्यात आले आहे, कमिन्सवर वनडे आणि कसोटीची जबाबदारी दिल्याने मार्शला पूर्णवेळ टी-20 कर्णधारही ठेवता येईल.

### ऑस्ट्रेलियाचा T20 संघ

» मिचेल मार्श (C), शॉन ॲबॉट, जेसन बेहरेनडॉर्फ, टिम डेव्हिड्स, नॅथन एलिस, आरोन हार्डी, ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस, स्पेन्सर जॉन्सन, ग्लेन मॅक्सवेल, मॅट शॉर्ट, स्टीव्हन स्मिथ, मार्कस स्टॉइनिस, ॲडम झाम्पा.

# इंझमाम पाकिस्तानचा चीफ सिलेक्टर!

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था



पाकिस्तानचा माजी कर्णधार इंझमाम-उल-हक याची पाकिस्तान क्रिकेट संघाचा मुख्य निवडकर्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याआधी तो संघाच्या कोचिंग स्टाफचा भाग होता. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने सोमवारी त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवर 53 वर्षीय इंझमाम-उल-हक यांची मुख्य निवडकर्ता म्हणून नियुक्ती जाहीर केली. 53 वर्षीय इंझमाम माजी निवडकर्ता हारून रशीद यांची जागा घेणार आहे. गेल्या महिन्यात रशीद यांनी आपले पद सोडले.

आशिया चषकासाठी संघ निवडण्याची जबाबदारी इंझमामकडे असेल कारण बोर्डाने एक दिवस आधीच विश्वचषकासाठी 13 खेळाडूंची निवड केली होती. बोर्डाने 2 रिक्त जागांसाठी 6 खेळाडूंची नावे देखील शॉर्टलिस्ट केली आहेत. आशिया कपसाठी पाकिस्तानचा संघ निवडण्याची जबाबदारी माजी पाकिस्तानी कर्णधार इंझमामकडे असेल. यावेळी पाकिस्तान आशिया कपचे यजमानपद भूषवत असल्याने ही जबाबदारीही वाढली आहे. अशा स्थितीत इंझमामला असा संघ निवडावा लागेल, जो ट्रॉफी जिंकू शकेल. गेल्या आशिया कपच्या अंतिम फेरीत पाकिस्तानी संघाला श्रीलंकेविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला होता. आशिया चषकाचा चालू हंगाम 30 ऑगस्टपासून पाकिस्तान आणि श्रीलंकेत खेळवला जाणार आहे. इंझमाम-उल-हकने 30 कसोटी सामन्यांमध्ये पाकिस्तानचे नेतृत्व केले आहे. त्याने 378 एकदिवसीय सामनेही खेळले आहेत. त्याच्या नावावर 20 हजाराहून अधिक आंतरराष्ट्रीय धावा आहेत. यामध्ये 35 शतकांचा समावेश आहे. इंझमाम-उल-हक यापूर्वी पाकिस्तानचा निवडकर्ता होता. इंझमामने 2016 ते 2019 दरम्यान हे पद भूषवले होते.